# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७-१८/ऑफलाईन कार्यवाही/ २७६९ दि.-०५/०३/२०१८

6 MAR 2018

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची ऑफलाईन पध्दतीने कार्यवाही करणे बाबत..
**अर्ज स्विकृतीच्या कालावधीमध्ये मुदतवाढ देणे बाबत...**

संदर्भ :- संचालनालयाचे परिपत्रक क्र.उशिसं/शिष्य./२०१७/ऑफलाईन कार्यवाही/१९७६, दि. १६.०२.२०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय संचालनालयाच्या परिपत्रकानुसार सन २०१७-१८ करीता उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील खालील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनांची नावे | विभागीय सहसंचालक कार्यालयांकडे सादर करावयाचे अर्ज | संचालनालयास सादर करावयाचे अर्ज |
|---|---|---|---|
| ०१ | हिंदी मधील मॅट्रीकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषीक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०२ | एकलव्य आर्थिक सहाय्य | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०३ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०४ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०५ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०६ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०७ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | नुतनीकरण | नवीन मंजूरी |
| ०८ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नुतनीकरण | नवीन मंजूरी |
| ०९ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | नुतनीकरण | नवीन मंजूरी |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | नवीन मंजूरी / नुतनीकरण | - |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | नवीन मंजूरी / नुतनीकरण | - |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता विद्यार्थी, महाविद्यालय यांना खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.** सदर शिष्यवृत्तीबाबतची माहिती, शिष्यवृत्तींचे ऑफलाईन अर्जाचे नमुने संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| ०१ | **विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची मुदत** | **०७.०३.२०१८ पर्यंत** |
| ०२ | **महाविद्यालयांनी वरील तक्त्याप्रमाणे विभागीय सहसंचालक कार्यालये / उच्च शिक्षण संचालनालय यांचेकडे अर्ज पाठविण्याची मुदत** | **१०.०३.२०१८ पर्यंत** |

उपरोक्त शिष्यवृत्तीच्या ऑफलाईन कार्यवाही तसेच अंतिम मुदत याबाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना तात्काळ इमेल, दुरध्वनी, परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात याव्यात.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

Scanned by CamScanner